ePaper

| वर्ष - 7 । अंक - 127 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । शनिवार, दिनांक 9 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# फडणवीस-बावनकुळेंकडून आमदार-खासदारांची कानउघडणी



## आतील पानांत


- भारत-पाक सामना धोक्यात?
- ठरलं तर मग 'जुईचं' लग्न
- इंडिया-भारत वादावर बोलू नका!
- जरांगे पाटील फकीर माणूस!


# भोसरीत महेशदादा; चिंचवडमध्ये शंकरभाऊ
# भाजपाच्या जोडीचा 'दहीहंडी जल्लोष'!

## » राजकीय वर्तुळात दोन्ही नेत्यांची 'हवा' : राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीत शांतता





**।पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।**

**राज्यातील सत्ताबदल आणि लांबणीवर पडलेल्या निवडणुका यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील राजकीय वर्तुळात कमालीची शांतता आहे. मात्र, भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे आणि शहराध्यक्ष शंकर जगताप जोडीने दहीहंडी उत्सवाच्या निर्मित्ताने अक्षरश: 'हवा' केली.**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शहरातील राष्ट्रवादीत दोन गट पडले. त्यामुळे अजित पवार समर्थक प्रभावशाली गट शांत भूमिकेत आहे. भाजपाविरोधात आवाज उठवणारे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष आता महायुतीच्या धर्माचे पालन करावे लागत असल्यामुळे संयमाच्या भूमिकेत आहेत. दुसरीकडे, महाविकास आघाडी म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे किंवा काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांची आक्रमकताही कमी आहे. मराठा आंदोलन आणि आरक्षणाच्या मुद्यावर विरोधी पक्षाकडून महायुतीला 'लक्ष्य' करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, त्याचा अपेक्षीत प्रभाव दिसत नाही.

किंबहुना, पिंपरी-चिंचवड बंद बाबतही अद्याप सर्व विरोधी पक्षांमध्ये एकवाक्यता दिसत नाही. राज्यात 'इंडिया' आघाडी प्रभाव दाखवण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, पिंपरी-चिंचवडमध्ये तसे चित्र नाही. दुसरीकडे, महापालिका निवडणुका अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या माननीयांनीही दहीहंडी उत्सवासाठी हात आखडता घेतला आहे. एकूणच कार्यक्रम, उत्सव आणि उपक्रमांवर खर्च करण्याची मानसिकता दिसत नाही. त्याचे पडसाद दहीहंडी उत्सवावर दिसले.मानाच्या मंडळांनीसुद्धा मोजक्या सेलिब्रेटींच्या उपस्थितीत कार्यक्रम आटोपता घेतला. यंदाच्या उत्सवामध्ये राष्ट्रवादी, शिवसेना किंवा अन्य विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये मनमुराद जल्लोष पहायला मिळाला नाही. याउलट, चिंचवड विधानसभा मतदार संघात भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप आणि भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी बाजी मारली. दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने दोन्ही नेत्यांनी ठेका धरला आणि वातावरण जल्लोषाचे केले. त्यामुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला.

### भोसरीतील प्रमुख उत्सव...

»भोसरी येथील पी.एम.टी. चौक येथे श्री भैरवनाथ दहीहंडी उत्सव समितीच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आली. यावेळी कुस्ती व बैलगाडा शर्यत यावर आधारित मराठी चित्रपट "रांगडा" चा टिझर रिलिझ करण्यात आला. मोशी येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जय गणेश युवा फाउंडेशनच्या पुढाकाराने नागेश्वर महाराज दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. चिखली घरकुल मेन सर्कल येथे निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशन व शिवरक्त प्रतिष्ठान आणि मल्हार वाद्यपथक आयोजित दहीहंडी उत्सव झाला. संत तुकारामनगर, भोसरी येथील वसंतनाना लोंढे प्रतिष्ठाच्या वतीने पिंपरी-चिंचवडमधील पहिला महिला सार्वजनिक दहीहंडी उत्सव दिमाखात साजरा झाला. यावेळी क्रांतीनाना मळेगावकर प्रस्तूत "गोपिकांसंगे खेळ रंगला पैठणीचा" कार्यक्रम झाला. भोसरीतील कार्यक्रमामध्ये आमदार महेश लांडगे यांनी 'जय श्रीराम'चा नारा देत गोविंदाच्या गाण्यांवर ठेका धरला.

### चिंचवडमधील प्रमुख उत्सव...

»भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवामध्ये शहराध्यक्ष शंकर जगताप सहभागी झाले. तसेच, आकुर्डी येथील कैलास कुटे यांच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडीचे उत्योसवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाच्या वेळी स्वराज्य ढोलताशा पथकाच्या वतीने वादन करण्यात करण्यात आले. तसेच डीजे व आकर्षक रोषणाईच्या तालावर तरुणाई थिरकत होती. सहकाऱ्यांसह डीजेच्या तालावर नृत्य करण्याचा करण्याचा आनंद जगताप यांनी घेतला. यासह वाल्हेकरवाडी येथे माजी महापौर सचिन चिंचवडे यांनी आयोजित केलेल्या उत्सवातही शंकर जगताप यांनी सहभागी होत गोविंद पथकांचा उत्साह वाढवला. यासह चिंचवडमधील सर्वाधिक दहीहंडी उत्सवांना शंकर जगताप यांनी उपस्थित दर्शवली आहे.

# वाहनचालकांचा थकीत दंड कमी!

## 5 हजार 877 वाहनचालकांना पुन्हा एक संधी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**वाहतूक नियमभंगाच्या थकीत दंड प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांसाठी सुरू करण्यात आलेल्या मदत केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत पाच हजार ८७७ वाहनचालकांचा दंड कमी करण्यात आला. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि वाहतूक पोलिसांकडून वाहतूक नियम उल्लंघनाचे थकीत खटल्यांचा निपटारा करण्यासाठी शनिवारी (९ सप्टेंबर) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.**



लोकअदालतीचे कामकाज शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून सुरु होणार आहे. वाहतूक नियमभंगाच्या थकीत दंडाचे प्रमाण मोठे आहे. थकीत दंडाची रक्कम कमी करणे, तसेच वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यासाठी पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेकडून २८ ऑगस्टपासून वाहनचालकांसाठी मदत केंद्र (हेल्प डेस्क) सुरू करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत मदत केंद्राचे कामकाज सुरू राहणार आहे. आतापर्यंत पाच हजार ८७७ वाहनचालकांवरील थकीत दंड कमी करण्यात आला आहे. प्रलंबित खटला, थकीत दंडाची रक्कम कमी करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत. वाहनचालकांना दंडाच्या रकमेतून सूट देण्यात येणार आहे. मदत केंद्रात न्यायालयातील पॅनल असणार आहे. मदत केंद्रात थकीत दंड कमी करून घेण्यासाठी येणाऱ्या वाहनचालकांनी आधारकार्डची झेरॉक्स प्रत आणावी, असे आवाहन वाहतूक पोलीस आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. लोकअदालतीत जास्तीत जास्त खटल्यांचा निपटारा करण्यासाठी १९ न्यायदंडाधिकारी, सहकारी उपस्थित राहणार आहेत. येरवडा येथील वाहतूक शाखेचक्या कार्यालयात शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून कामकाज सुरू करण्यात येणार आहे. १९ मदत केंद्र तेथे असणार आहेत. प्रथम येणाऱ्या वाहनचालकास प्राधान्य देण्यात येणार आहे. वाहनचालकांना टोकन देण्यात येणार आहे. मदत केंद्राद्वारे आतापर्यंत वाहनचालकांना दंडाच्या रक्कमेतून ५० टक्के सवलत देण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी दिली.

### लोकअदालतीत प्रथम येणाऱ्यास प्राधान्य

» लोकअदालतीत जास्तीत जास्त खटल्यांचा निपटारा करण्यासाठी १९ न्यायदंडाधिकारी, सहकारी उपस्थित राहणार आहेत. येरवडा येथील वाहतूक शाखेचक्या कार्यालयात शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून कामकाज सुरू करण्यात येणार आहे. १९ मदत केंद्र तेथे असणार आहेत. प्रथम येणाऱ्या वाहनचालकास प्राधान्य देण्यात येणार आहे. वाहनचालकांना टोकन देण्यात येणार आहे. मदत केंद्राद्वारे आतापर्यंत वाहनचालकांना दंडाच्या रक्कमेतून ५० टक्के सवलत देण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी दिली. प्रलंबित खटला, थकीत दंडाची रक्कम कमी करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत. वाहनचालकांना दंडाच्या रकमेतून सूट देण्यात येणार आहे. मदत केंद्रात न्यायालयातील पॅनल असणार आहे. मदत केंद्रात थकीत दंड कमी करून घेण्यासाठी येणाऱ्या वाहनचालकांनी आधारकार्डची झेरॉक्स प्रत आणावी, असे आवाहन वाहतूक पोलीस आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

# खडकवासला धरण साखळीतील पाणीसाठ्यात झाली किंचित वाढ!

## शुक्रवारी दिवसभर पाऊस झाल्याने वाढ

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**खडकवासला धरण साखळीतील पानशेत, वरसगाव, टेमघर व खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात शुक्रवारी दिवसभर पाऊस झाला. यामुळे धरणसाठ्यात किंचितशी वाढ झाल्याचे पाटबंधारे विभागाच्या नोंदीमध्ये दिसून आले.**



या चार हि धरणात शुक्रवारी सकाळी सहा वाजल्यापासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत खडकवासला येथे १३ पानशेत मध्ये १८ वरसगावला २० टेमघर मध्ये २५ मिलिमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. खडकवासला धरणात ०.९० टीएमसी म्हणजे ४५.७२ टक्के पाणीसाठा आहे.

पानशेत १०.५८ टीएमसी म्हणजे ९९.४१ टक्के आहे. वरसगाव मध्ये १२.७१ टीएमसी म्हणजे ९९.१० टक्के पाणी जमा आहे. तर टेमघर धरणात २.९७ टीएमसी म्हणजे ८०.०३ टक्के पाणीसाठा झाला आहे. सकाळी चार हि धरणात मिळून २७.१५ टीएमसी म्हणजे ९३.१३ टक्के पाणीसाठा होता. संध्याकाळी पाच वाजता हा पाणीसाठा १७.१६ टीएमसी म्हणजे ९३.१७ टक्के पाणीसाठा झालेला आहे. दरम्यान, दिवसभरात खडकवासला धरणातून शहराला पिण्यासाठी आणि कालव्यातून १००५ क्युसेक पाणी शेतीसाठी सोडले जात आहे.

अकरा तासात १३ दशलक्ष घनफूट पाणी जमा झाले आहे. वरसगाव धरणातून वीजनिर्मितीसाठी ६०० क्युसेकचा विसर्ग सोडला आहे. तसेच पानशेत धरणातून हि वीज निर्मितीसाठी ६०० क्युसेकचा विसर्ग सोडला आहे. दोन्ही धरणातून सोडलेला एकूण विसर्ग एक हजार २०० क्यूसेकचा विसर्ग थेट खडकवासला धरणात जमा होत आहे.

# लोखंडी सांगाडा कोसळून महिला जखमी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

गणेश पेठेत दहीहंडीच्या दिवशी गुरुवारी (ता. ७) लोखंडी सांगाडा कोसळून चार ज्येष्ठ महिला जखमी झाल्याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी मंडळाच्या चार कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत गणेश लालचंद चंगेडिया (वय ३८, रा. नाना पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. मंडळाचे कार्यकर्ते राहुल चव्हाण, अजय बबन साळुंखे, गोपी चंद्रकांत घोरपडे (रा. गणेश पेठ) आणि चेतन समाधान आहिरे (रा. खराडी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश पेठेतील पांगुळ आळीत श्रीकृष्ण तरुण मंडळाकडून दहीहंडी उत्सवासाठी ध्वनी आणि प्रकाश योजनेसाठी लोखंडी




सांगाडा उभारण्याचे काम सुरू होते. त्यावेळी तेथून जाणाऱ्या महिलांच्या अंगावर लोखंडी सांगाडा कोसळून त्या जखमी झाल्या.

मंदा लालचंद चंगेडिया (वय ६७), निर्मलादेवी नवीन पुनमिया (वय ६९), केवलचंद मांगीलाल सोळंकी (वय ६६) आणि ताराबाई केवलचंद सोळंकी (वय ६४) अशी जखमी झालेल्या महिलांची नावे आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# धरणक्षेत्रात संततधार!

## नागरिकांना सतर्कतेचा इशारा : पवना नदीच्या पाणीपातळीत वाढ

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सततच्या पर्जन्यवाढीमुळे पवना धरण क्षेत्रात पडणारा पाऊस तसेच पवना धरणातून केला जाणारा पाण्याचा विसर्ग यामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. त्यामुळे नदीतील पाणी पातळीची संभाव्य वाढ लक्षात घेता अशा परिस्थितीत कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी महापालिकेच्या वतीने आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना घेण्यात येत असून नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.**



पवना, आंद्रा तसेच वडीवळे धरण क्षेत्र आणि धरणाच्या पुढील भागात होणारे पर्जन्यमान लक्षात घेता, पवना व इंद्रायणी नदीपात्रात आज सायंकाळपर्यंत अजून पाणी पातळीत वाढ होऊ शकते. याबाबत सर्वांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. पवना धरण १०० टक्के भरल्याने सकाळी धरणाच्या वीज निर्मिती गृहाद्वारे आणि धरणाच्या सांडव्यावरून एकूण ५ हजार ६०० क्यूसेकने पाण्याचा विसर्ग पवना नदीत करण्यात आला असून यामध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यादृष्टीने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, अशा सूचना पवना धरणाच्या प्रमुखांकडून प्राप्त झाल्या असून धरणाच्या विसर्गामध्ये आवश्यक कमी अधिक बदल होऊ शकतो, त्यामुळे नदीपात्रात कोणीही उतरू नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार येत्या काही दिवसात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पावसात रस्त्यावरील विजवाहक तारा, विजेचे खांब, डी. पी. बॉक्स, फीडर बॉक्स, इत्यादी विदयुत वाहक ठिकाणांच्या संपर्कात येऊ नये तसेच अशा ठिकाणी जनावरे सोडू नये किंवा बांधू नये. औदयोगिक क्षेत्रात उघडयावर रासायनिक पदार्थांचा साठा करु नये. अशा ठिकाणी पाण्याचा संपर्क आल्यास दुर्घटना संभवू शकतात त्यामुळे त्यापासून नागरिकांनी जपून रहावे, असे आवाहन सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले आहे.

### महत्वाचे दूरध्वनी क्रमांक :

» मध्यवर्ती पूरनियंत्रण कक्ष- ०२०- २८३३११११ / ६७३३११११

### अग्निशमन केंद्रांचे संपर्क क्रमांक

| क्र. | अग्निशमन केंद्राचे नांव पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | जन.अरुणकुमार वैद्य मुख्य अग्निशमन केंद्र, पिंपरी संत तुकराम नगर, पिंपरी -१८. | २७४२३३३३ २७४२२४०५ ९९२२५०१४७५ |
| २ | उप अग्निशमन केंद्र, भोसरी लांडेवाडी भोसरी | ८६६९६९२१०१ ९९२२५०१४७६ |
| ३ | उप अग्निशमन केंद्र, प्राधिकरण सें.क्र २३ प्राधिकरण, निगडी – ४४ | २७६५२०६६ ९९२२५०१४७७ |
| ४ | उप अग्निशमन केंद्र, रहाटणी सं.न. १, औंधरोड, रहाटणी, पुणे – १७. | ८६६९६९३१०१ ९९२२५०१४७८ |
| ५ | उप अग्निशमन केंद्र, तळवडे आयटी पार्क जवळ, लक्ष्मी नगर, तळवडे | ९५५२५२३१०१ २७६९०१०१ |
| ६ | उप अग्निशमन केंद्र, चिखली जाधववाडी. चिखली | २७४९४८४९ ८६६९६९४१०१ |

# गायत्री इंग्लिश स्कूलमध्ये दहीहंडी उत्साहात!

## विद्यार्थ्यांकडून "जय कन्हैया लाल की.."चा जयघोष : राधाकृष्ण यांच्या वेशभूषेतील 'सेल्फी पॉईंट'चे आकर्षण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"हाथी घोडा पालखी.... जय कन्हैया लाल की.." हा जयघोष, विद्यार्थ्यांनी केलेली राधाकृष्ण यांची आकर्षक वेशभूषा, दहीहंडी फोडण्यासाठी बाल गोपाळांकडून लावले जाणारे थर... अशा उत्साहाच्या वातावरणात स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल, मोशी येथे दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.**





सकाळपासूनच बाळ गोपाळांची लगबग सुरू होती. दहीहंडी फोडण्याची त्यांची उत्सुकता शिगेला पोचली. पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक अशा वेगवेगळ्या स्तरातील विद्यार्थ्यांची स्वतंत्र दहीहंडी आयोजित करण्यात आली. श्रीकृष्णाचा पाळणा गाऊन जन्मोत्सव साजरा केला.

यावर्षी राधाकृष्ण यांच्या वेशभूषेतील 'सेल्फी पॉईंट' हे महत्त्वाचे आकर्षण ठरले. संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष विनायकराव भोंगाळे व इतर सभासद यांनी सर्व बाळगोपाळांना शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यवस्थापकीय संचालक कविता भोंगाळे कडू-पाटील, विश्वस्थ सरिता विखे-पाटील उपस्थित होत्या.

### परिसरात आनंदमय वातावरण


» या कार्यक्रमासाठी संस्थेच्या विशेष कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली भागवत ,एसएससी विभागाच्या उपमुख्याध्यपक सौ प्रिया नेवाले व त्यांच्या टीम ने मार्गदर्शन केले . विद्यार्थ्यांच्या नृत्याने व जल्लोषाने परिसरातील सर्वच वातावरण आनंदमय झाले होते.

# विद्यार्थ्यांची आत्महत्या नव्हे, व्यवस्थेने केलेली हत्याच!




**मध्ये काही काळ शेतकऱ्याच्या आत्महत्या हा विषय गाजला. त्याचे सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन तो सरकारी पातळीवर चर्चेचा ठरला. पण तरुण विद्यार्थी जीवन संपविण्याचे पाऊल उचलतात त्याकडे आजही गांभीर्याने पाहिले जात नाही. यातील अनेक मृत्यू हे परीक्षेच्या अवाजवी तणावामुळे घडले आहेत.**

राजस्थानमधील कोटा शहर हे शिकवणी (क्लास)ची फॅक्टरी म्हणून प्रसिद्ध आहे. तिथे भावी इंजिनीअर्स, डॉक्टर्स तयार होण्यासाठी प्रवेश परीक्षेसाठीची पूर्वतयारी करवून घेतात. तीही दोन वर्षे! अतिशय कठीण अन् तणावाचा काळ असतो हा मुलांसाठी. पालक चक्क कर्ज काढून, पोटाला चिमटा लावून हा लाखो रुपयांचा खर्च करतात. पहाटे उठल्यापासून रात्री झोपपर्यंत अभ्यास, गृहपाठाशिवाय, सतत होणाऱ्या चाचण्यांशिवाय दुसरा कसलाही टाईमपास नाही. प्रसंगी इथले शिक्षक अतिशय कठोर होतात. कारण त्यांच्या क्लासेसचे यश मुलाच्या चांगल्या गुणांवर अवलंबून असते. इथे कुणी कुणाचा मित्र नसतो. सगळे एकमेकांचे स्पर्धक असतात. त्यामुळे या काळात लळा, जिव्हाळा, प्रेम सहानुभूती, काळजी हे शब्दच मुलांना माहिती नसतात. या सर्व गोष्टींचा प्रचंड ताण असतो. शिवाय पालकांचा ताण वेगळाच.



एका माहितीनुसार कोटामध्ये दरवर्षी होणाऱ्या आत्महत्यांचा आकडा दोन अंकी आहे. गेल्या सात आठ वर्षात या शहरात १५० वर मुलामुलींनी जीव गमावला आहे, असेही सांगितले जाते. हे विधान चमत्कारिक वाटेल. पण या आत्महत्या नाहीत. त्यांच्याच घरच्यांनी, शिक्षकांनी केलेले हे खून आहेत! अनेक वर्षापासूनचा हा चुकीचा ग्रह आहे पालकांचा की मुलांनी इंजिनिअर, डॉक्टर, आयएएस अधिकारीच झाले पाहिजे. जणू इतर क्षेत्रे गौण आहेत. त्यातही माहिती तंत्रज्ञान, संगणक ही क्षेत्रे घ्या आणि पदवी घेऊन एकदाचे परदेशात जा. म्हणजे पालकांचे घोडे गंगेत न्हाले! खरे तर कला, विज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, लिबरल आर्टस, कायदा, समाजशास्त्र अशा सर्वच क्षेत्रात करियरला तितकाच प्रचंड वाव आहे. आता तर भविष्यातील गरजा, नोकऱ्या, कामाचे स्वरूप हे सातत्याने प्रचंड वेगाने बदलणार आहे. तिथे तुम्ही काय शिकलात, किती शिकलात, तुमची श्रेणी काय याला फारसे महत्व राहणारच नाही. तुमची स्वतःची क्षमता काय, सातत्याने नवे, नव्या दमाने, तत्परतेने शिकण्याचे, जुने विसरून नवे आत्मसात करण्याचे कौशल्य तुमच्यात कितपत आहे हेच तपासले जाणार. अधिक वेगाने, अधिक अचूकपणे तुमची सगळी बौद्धिक कामे कौशल्याने करणारे तंत्र म्हणजे एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता वेगाने विकसित होते आहे. त्यामुळे भविष्यातील कामाचे, नोकरीचे स्वरूप आरपार बदलणार. तिथे तुमची पदवी आयआयटीची की एनआयटीची हे कुणी विचारणार नाही. तुम्हाला तुमची नव्याने ओळख करून द्यावी लागणार. तुमचे कौशल्य सतत सिद्ध करावे लागणार. त्यासाठी तुमची भावनिक, मानसिक क्षमता, भावनिक बुद्धिमत्ता महत्वाची ठरणार. आत्महत्या करणारी व्यक्ती मानसिक, भावनिकदृष्ट्या कणखर नसते. ती स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची क्षमता गमावून बसते. आपल्यासाठी चांगले काय, वाईट काय हे वयात आल्यावर पालकांनी नाही, तर आपण स्वतः ठरवायचे असते. आमच्या बंड्याला, किंवा बबडीला कसलीच अक्कल नाही या भ्रामक समजुतीतून पालकांनी बाहेर आलेले बरे! पण मुलांचे बालपण, त्यांचे तारुण्य यातली गंमत पालक हिरावून घेताना दिसतात. गेल्याच आठवड्यात महाराष्ट्रात एका सातवीच्या मुलीने आत्महत्या केल्याचे वृत आले. या कोवळ्या मुलीचे दिवसाचे वेळापत्रक बघा. सकाळी सात ते तीन शाळा, दुपारी चार ते रात्री आठ शिकवणी, नंतर झोपेपर्यंत गृहपाठ! अवांतर वाचन नाही, खेळ नाही, गप्पा नाही, हसणे खिदळणे नाही. फक्त चरकात ऊस पिळतात तसे फोल्पट होऊन बाहेर पडायचे. आयुष्य एन्जॉय करायचे नाही. कोवळ्या वयात किती अत्याचार? घाण्याच्या बैलासारखे अभ्यासाच्या चाकाभोवती फिरत राहायचे. ही मुले अशाने आपले बालपण, तारुण्य हरवून बसतात. त्यातील निवडक काही ताण सहन करीत, स्वसामर्थ्याने यशस्वी होतात. इंजिनिअर, डॉक्टर होतात. पण चांगला माणूस म्हणून, जबाबदार सुसंस्कृत नागरिक म्हणून, किती घडतात, यशस्वी, खऱ्या अर्थाने

## संपादकीय »

### संघ आणि आरक्षण!

***सरसंघचालक आरक्षणाच्या मुद्दयावर इतकी पुरोगामी भूमिका घेतच आहेत तर त्याची तार्किक परिणती त्यांनी जातनिहाय जनगणनेस पाठिंबा देऊन करणे योग्य ठरेल***

"जोपर्यंत भेदभाव आहे, तोपर्यंत आरक्षण सुरूच राहायला हवे" हे सरसंघचालक मोहनराव भागवत यांनीच धडधडीतपणे स्पष्ट केले हे उत्तम झाले. त्यांचे त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन. याआधी संघाचे दत्तात्रय होसबाळे आदींनी अशी भूमिका मांडली होती. पण सरसंघचालकांनीच इतक्या स्पष्टपणे हा मुद्दा मांडल्याने तो अधिक खोल जाईल. आरक्षणाच्या गरजेबाबत बोलून सरसंघचालक थांबले नाहीत. त्यांनी पुढे जात 'अनेकांनी दोन हजार वर्षे अन्याय सहन केला, मग आम्ही दोनेकशे वर्षे कष्ट सोसले तर काय बिघडले?' असा प्रश्नही विचारला. त्यास दिवाणखानी म्हणायचे कारण चार भिंतींच्या सुरक्षेखेरीज असे काही विचारण्याची हिंमत या मंडळींत नसते. हे उच्चवर्णीय म्हणजे कोण हे सांगण्याची गरज नाही. धर्मविचार, वर्ण, वर्ग आणि आर्थिक स्तर यांमुळे हा वर्ग कोठूनही उठून दिसतो.

**सिंहासम काळजाचा लढवय्या' (लायनहार्टेड) असे त्याचे वर्णन नेहमी केले जायचे. पण हीथ स्ट्रीकच्या कोणत्याच लढाया सोप्या नव्हत्या. झिम्बाब्वेसारख्या देशात जन्म. त्यामुळे क्रिकेटच्या विश्वात नेहमीच कुचंबणा. झिम्बाब्वेमध्ये रॉबर्ट मुगाबेंच्या सरकारमुळे भल्याबुऱ्या स्वरूपातील वसाहतवादविरोधी जाणिवा उफाळून आल्या. त्यांची झळ गोऱ्या हीथ स्ट्रीकच्या कुटुंबीयांना सर्वाधिक बसली.**

## हीथकडे चांगले नेतृत्वगुण होते

आयुष्याची पन्नाशी उलटण्याच्या आतच दुर्धर रोगाने पिच्छा पुरवला. ती लढाई त्याच्यासाठी शेवटचीच ठरली आणि वयाच्या अवघ्या ४९ व्या वर्षी त्याचा मृत्यू ओढवला. पण या सगळय़ांशी लढताना तो कधीही खचलेला दिसला नाही किंवा स्वत:च्या परिस्थितीचा विनाकारण बाऊदेखील त्याने कधी केला नाही. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांप्रमाणेच झिम्बाब्वेतील गोरेही जमीनमालक होते. पशुधन पालन आणि वन्यजीव अधिवास असलेल्या राखीव उद्यानांची राखणदारी यांमुळे अंगभूत रांगडेपणा आणि हिंमत या भांडवलावर यांतील बहुतेक जण खेळांकडे वळतात. हीथ स्ट्रीक अशांपैकीच एक. हीथ अष्टपैलू होता. तेज गोलंदाजी करायचा, उत्तम आक्रमक फलंदाज होता आणि मैदानावर चपळ क्षेत्ररक्षकही होता. वयाच्या १९व्या वर्षी भारतात एका स्पर्धेत त्याचे आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत पदार्पण झाले. त्याच



वर्षी पाकिस्तानविरुद्ध त्याचे कसोटी पदार्पणही झाले. रावळिपडीत झालेल्या त्या सामन्यात हीथ स्ट्रीकने आठ बळी मिळवले. १९९३ ते २००५ या काळात तो झिम्बाब्वेसाठी ६५ कसोटी आणि १८९ एकदिवसीय सामने खेळला. यात अनुक्रमे २१६ बळी व १९९० धावा आणि २३९ बळी व २९४३ धावा अशी त्याची कामगिरी तगडय़ा संघांविरुद्ध झालेली आहे. इतर बहुतेक देशांप्रमाणे हीथ स्ट्रीकसमोर 'दुबळा प्रतिस्पर्धी' असा काही पर्याय उपलब्धच नव्हता. तो भरपूर वेगाने चेंडू टाकायचा आणि चांगला स्विंगही करायचा. त्याची तंदुरुस्ती उत्तम होती. सहा फुटांची पीळदार चण असूनही त्याचे क्षेत्ररक्षण चपळ आणि उच्च दर्जाचे होते. हीथकडे चांगले नेतृत्वगुण होते. त्यामुळे झिम्बाब्वेचा सर्वाधिक यशस्वी कर्णधार म्हणूनही त्याचेच नाव घ्यावे लागेल. सन २०००मध्ये क्रिकेट जगतातील तेव्हाच्या सर्वात दुबळय़ा संघाची धुरा त्याच्याकडे आली. अनेक सामने त्याने एकहाती जिंकून दिले. २१पैकी चार कसोटी सामने आणि ६५पैकी १८ एकदिवसीय सामने हीथच्या नेतृत्वाखाली झिम्बाब्वेने जिंकले. झिम्बाब्वे क्रिकेटच्या कारभारात तेथील सरकारचा हस्तक्षेप, क्रिकेटपटूंना मिळणारे तुटपुंजे मानधन आणि अश्वेत क्रिकेटपटूंसाठी लागू झालेली कोटा पद्धती यांना त्याने कडाडून विरोध केला. याच मुद्दय़ावर दोन वेळा त्याने कर्णधारपद सोडले. लवकरच आंतरराष्ट्रीय क्रिकेटलाही 'गुडबाय' केला. गेल्या काही वर्षांमध्ये वेगवेगळय़ा संघांसाठी प्रशिक्षक म्हणून काम करताना त्याने अप्रत्यक्षरीत्या सामनेनिश्चिती करणाऱ्या साखळीला मदत केली, असा आरोप झाल्यावर

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येऊ नये!

## » कुणबी समाजाचे नेते आक्रमक, उद्यापासून आंदोलन करणार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येऊ नये, या मागणीसाठी कुणबी समाजाचे नेते आक्रमक आहे. आम्ही उद्यापासून संविधान चौकात आंदोलन करणार असे भाजप नागपूर ग्रामीणचे अध्यक्ष सुधाकर कोहळे यांनी म्हटले आहे. या आंदोलनात आम्ही सहभागी होणार आहेत, असेही कोहळे यांनी म्हटले आहे.**



ओबीसी नेते प्रकाश शेंडगे म्हणाले की, आमची भाजीभाकरी ओढू नका, ती हिसाकावू नका अशी मागणी प्रकाश शेंडगे यांनी केले आहे. मनोज जरांगे पाटील हे सध्या मराठा आरक्षणासाठी उपोषण करत आहे. मराठ्यांना ओबीसी आरक्षण देण्यासाठी ते उपोषणाला बसले आहेत. त्यांनी ही मागणी सोडून द्यावी अशी मागणी ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केली आहे. ओबीसी नेत्यांची आज नागपुरात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ओबीसी नेत्यांनी मोठा निर्णय घेतला. त्यामुळे सरकारची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. एकीकडे जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे सरकारवरील दबाव वाढताना दिसतोय. तर दुसरीकडे आता राज्यातील ओबीसी नेते संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन करणार असल्याने सरकारची चिंता वाढणार आहे. ओबीसी नेत्यांनी आजच्या बैठकीत उद्यापासून राज्यभर आंदोलन पुकारण्याचा निर्णय घेतलाय. ओबीसी नेते उद्या राज्यभर आंदोलन पुकारणार आहेत. ओबीसी नेत्यांची आज नागपुरात बैठक पार पडली. या बैठकीत उद्यापासून राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कुणबी-मराठा समाजाला आमच्यातील आरक्षण देऊ नका हीच महत्त्वाची मागणी या नेत्यांची आहे. तसेच मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्या, असे या नेत्यांचे म्हणणे आहे. सखल कुणबी संघाकडून आंदोलनाची भूमिका तयार होत आहे. त्यानुसार उद्यापासून आंदोलन केले जाणार आहे. नागपुरात उद्या संविधान चौकला आंदोलन केले जाणार आहे.

### आमची भाजीभाकरी ओढू नका

» आमची भाजीभाकरी ओढू नका, ती हिसाकावू नका अशी मागणी प्रकाश शेंडगे यांनी केले आहे. मनोज जरांगे पाटील हे सध्या मराठा आरक्षणासाठी उपोषण करत आहे. मराठ्यांना ओबीसी आरक्षण देण्यासाठी ते उपोषणाला बसले आहेत. त्यांनी ही मागणी सोडून द्यावी अशी मागणी ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केली आहे. ओबीसी नेत्यांची आज नागपुरात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ओबीसी नेत्यांनी मोठा निर्णय घेतला. त्यामुळे सरकारची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. एकीकडे जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे सरकारवरील दबाव वाढताना दिसतोय.

# अजितदादा पवारच्या गोटात 40 आमदार!

## » शरद पवार गटाने आयोगाला पाठवलेल्या ईमेलद्वारे झाले स्पष्ट

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादीच्या सत्तासंघर्षात सर्वात मोठी आणि महत्वाची अपडेट समोर आली आहे. पक्ष कोणाचा याबाबत वाद सुरू असतानाच निवडणूक आयोगाला शरद पवार गटाकडून उत्तर देण्यात आले आहे. यामध्ये अजित पवार गटाचे सर्व दावे फेटाळण्यात आले असून 9 मंत्र्यांसह 31 आमदारांविरोधात अपात्रतेची याचिकाही दाखल करण्यात आली आहे.**

यामुळे अजित पवारांच्या गटात एकूण 40 आमदार असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे G-20 परिषदेच्या बैठकीच्या निमित्ताने राजधानी दिल्लीतील सर्व कार्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाचे कार्यालय आज बंद आहे. पण तरीही एका मेलद्वारे शरद पवार गटाकडून निवडणूक आयोगाकडे उत्तर दाखल करण्यात आले आहे. मंत्र्यांशिवाय अजित पवार यांच्यासोबत गेलेल्या आमदारांच्या विरोधात अपात्रतेची याचिका दाखल करण्यात आली आहे. 9 मंत्र्यांशिवाय 31 आमदारांच्या विरोधातही अपात्रतेची याचिका दाखल करण्यात आली असून यातले 4 विधान परिषद आमदार असल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेनेपाठोपाठ आता राष्ट्रवादीत पक्षाची चिन्हाची लढाई सुरू होणार आहे.



निवडणूक आयोगाने अद्याप पक्षातल्या फुटीची केस म्हणून नोंद घेतलेली नाही. अजित पवारांनी 2 जुलैला बंड केल्यानंतर दोन महिन्यानंतर शरद पवार गटाने निवडणूक आयोगाला उत्तर दिले आहे. शरद पवार गटाकडून काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे दिली असल्याची माहिती समोर आली आहे. पहिल्यांदाच आमदारांचा आकडा समोर आला आहे. 9 मंत्र्यांच्या अपात्रतेच्या संदर्भात याचिका दाखल करण्यात आलेली होती. मात्र आता 31 आमदारांच्या अपात्रतेची याचिका दाखल केली आहे. त्याशिवाय यातले चार विधान परिषद आमदार असल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवार गटाकडून करण्यात आलेले सर्व दावे शरद पवार गटाने फेटाळले आहे.

### अपात्र आमदारांचा आकडा समोर

» शरद पवार गटाकडून काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे दिली असल्याची माहिती समोर आली आहे. पहिल्यांदाच आमदारांचा आकडा समोर आला आहे. 9 मंत्र्यांच्या अपात्रतेच्या संदर्भात याचिका दाखल करण्यात आलेली होती. मात्र आता 31 आमदारांच्या अपात्रतेची याचिका दाखल केली आहे. त्याशिवाय यातले चार विधान परिषद आमदार असल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवार गटाकडून करण्यात आलेले सर्व दावे शरद पवार गटाने फेटाळले आहे. अजित पवारांनी आपण राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचा, पक्ष आपल्या ताब्यात असल्याचा दावा केला होता तो शरद पवार गटाने फेटाळला आहे.

# असहमतीचा सन्मान करा!

## » खरगेंना G20 डिनरला आमंत्रित न केल्याने वाद

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना 9 सप्टेंबर रोजी होणाऱ्या G20 नेत्यांच्या डिनरसाठी आमंत्रित करण्यात आलेले नाही. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या डिनर देणार आहेत. यावर तमिळनाडू काँग्रेसचे नेते मोहन कुमारमंगलम म्हणाले की, मोदी आहे तर मनू आहे. खरगे दलित असल्याने त्यांना निमंत्रित करण्यात आले नाही. त्याचवेळी छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल म्हणाले की, असहमतीचा आदर केला पाहिजे.**



मीडिया रिपोर्ट्सनुसार, मोहन कुमारमंगलम म्हणाले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी महर्षी मनूचा वारसा सांभाळत आहेत. असे अनेक कार्यक्रम झाले ज्यात खालच्या जातीच्या नेत्यांना निमंत्रित केले गेले नाही. अयोध्येतील राम मंदिराच्या भूमिपूजनासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना निमंत्रित करण्यात आले नव्हते. नवीन संसदेच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आमंत्रित करण्यात आले नव्हते. मुख्यमंत्री भूपेश बघेल म्हणाले की, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना डिनरचे निमंत्रण न मिळणे दुर्दैवी आहे. विरोधकांच्या नाराजीचा आदर केला पाहिजे. राहुल गांधी युरोप दौऱ्यावर आहेत. 8 सप्टेंबर रोजी ते ब्रुसेल्स (बेल्जियम) येथे म्हणाले - G20 चे अध्यक्षपद मिळणे ही देशासाठी चांगली गोष्ट आहे. सरकारने मल्लिकार्जुन खरगे यांना G20 साठी आमंत्रित केले नाही. देशातील 60% जनतेचे नेतृत्व करणाऱ्यांना ते महत्त्व देत नाहीत, हे यावरून सिद्ध होते. यातूनही सरकारची विचारसरणी दिसून येते. नवी दिल्ली येथे 9 ते 10 सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या G20 शिखर परिषदेची तयारी पूर्ण झाली आहे. G20 सदस्यांच्या पाहुण्यांच्या आगमनाची प्रक्रिया सुरू झाली. इटलीचे पंतप्रधान ज्योर्जिओ मेलोनी यांच्यानंतर ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक पत्नी अक्षता मूर्तीसोबत नवी दिल्लीत पोहोचले आहेत. दिल्लीत होणाऱ्या G20 शिखर परिषदेला आता फक्त एक दिवस बाकी आहे. आज म्हणजेच 8 सप्टेंबर रोजी जी-20 गटातील बहुतांश दिग्गज नेते दिल्लीत पोहोचतील. त्यांच्या स्वागताची जबाबदारी केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बिडेन यांचे स्वागत जनरल व्ही के सिंग करणार आहेत.

### मनूचा वारसा मोदी पुढे चालवत आहेत

» मीडिया रिपोर्ट्सनुसार, मोहन कुमारमंगलम म्हणाले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी महर्षी मनूचा वारसा सांभाळत आहेत. असे अनेक कार्यक्रम झाले ज्यात खालच्या जातीच्या नेत्यांना निमंत्रित केले गेले नाही. अयोध्येतील राम मंदिराच्या भूमिपूजनासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना निमंत्रित करण्यात आले नव्हते. नवीन संसदेच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आमंत्रित करण्यात आले नव्हते.

# पंजाबमध्ये G20 विरोधात शेतकरी रस्त्यावर!

## » शेतकरी संघटनांकडून 90 ठिकाणी मोदींच्या पुतळ्याचे दहन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीत होत असलेल्या G-20 परिषदेविरोधात पंजाबमधील शेतकरी आणि मजूर आंदोलन करत आहेत. शेतकऱ्यांचा रोष केंद्र सरकारविरोधात आहे. केंद्र सरकारची देशविरोधी धोरणे देशाला गुलामगिरीकडे घेऊन जात असल्याचे शेतकरी नेत्यांचे म्हणणे आहे. पंजाबमध्ये 90 ठिकाणी पुतळे जाळले गेले. जगातील 75 टक्के आर्थिक स्त्रोतांवर नियंत्रण असलेल्या या परिषदेत सहभागी राष्ट्रांना भारतातील हवाई मार्गापासून ते सागरी मार्ग, पाणी, खाणकाम इत्यादी सर्व गोष्टी काबीज करायच्या आहेत, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. दूरसंचार आणि रेल्वे आधीच विकल्या गेल्या आहेत. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारमुळे हे सर्व घडणार असल्याचे ते म्हणाले.**



पंजाब मजदूर संघर्ष समितीचे सर्वन सिंग पंढेर म्हणाले की, केंद्र सरकारची धोरणे देशविरोधी आहेत. त्यामुळेच आज G-20 शिखर परिषदेला पंजाबमधीलच नव्हे तर उत्तर भारतात 16 शेतकरी संघटनांकडून विरोध केला जात आहे.

पंढेर म्हणाले की, जेव्हा दिल्लीत शेतकरी आंदोलन होते तेव्हा केंद्र सरकार म्हणायचे की लोकांच्या समस्या आहेत. ते म्हणाले की, केंद्र सरकारने आता दिल्लीत तीन दिवसांसाठी लॉकडाऊन लागू केला आहे. लोकांना रस्त्यावर येऊ दिले जात नाही. समोर मोठे पडदे लावून गरिबांच्या झोपडपट्ट्या लपल्या आहेत. त्यांच्या या कृत्यामुळे लोकांना आता त्रास होणार नाही, हे केंद्र सरकारने सांगावे. मजदूर-किसान संघर्ष समितीचे प्रमुख सुखविंदर सिंग साभ्रा आणि सलविंदर जानियन यांनी सांगितले की, जी-20 शिखर परिषदेत सहभागी देश भारतातील नैसर्गिक साधनसंपत्ती, तसेच शेतकऱ्यांची शेतं आणि पिके कशी ताब्यात घ्यावीत यासाठी बैठका घेणार आहेत. जी-20 शिखर परिषदेत यावर चर्चा होणार आहे. केंद्र सरकारची धोरणे पूर्णपणे देशविरोधी असून पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हेही त्यांच्या हातात खेळत असल्याचे दोन्ही शेतकरी नेते म्हणाले. देशाच्या पंतप्रधानांसह पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्याचेही दहन निषेध करत असल्याचे दोन्ही नेत्यांनी सांगितले. या त्याच शेतकऱ्यांची संघटना आहे ज्यांनी नुकताच 21 ऑगस्टला चंदीगडवर मोर्चा काढला होता. शेतकऱ्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी अनेक ठिकाणी लाठीचार्ज केला. दुसरीकडे अनेक शेतकऱ्यांना नजरकैदेत ठेवले तर अनेक शेतकऱ्यांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले. पंजाबमधील 13 जिल्ह्यांमध्ये 16 शेतकरी संघटना आंदोलन करत असल्याचे शेतकरी नेत्यांचे म्हणणे आहे. 13 जिल्ह्यांतील सर्व झोनमध्ये हे प्रात्यक्षिक घेण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. शेतकरी आणि मजूर आपापल्या झोनमध्ये जमून केंद्र सरकारचा पुतळा जाळून निदर्शने करत आहेत.

### जानिया म्हणाले की ते पिके ताब्यात घेतील

» मजदूर-किसान संघर्ष समितीचे प्रमुख सुखविंदर सिंग साभ्रा आणि सलविंदर जानियन यांनी सांगितले की, जी-20 शिखर परिषदेत सहभागी देश भारतातील नैसर्गिक साधनसंपत्ती, तसेच शेतकऱ्यांची शेतं आणि पिके कशी ताब्यात घ्यावीत यासाठी बैठका घेणार आहेत. जी-20 शिखर परिषदेत यावर चर्चा होणार आहे. केंद्र सरकारची धोरणे पूर्णपणे देशविरोधी असून पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हेही त्यांच्या हातात खेळत असल्याचे दोन्ही शेतकरी नेते म्हणाले. देशाच्या पंतप्रधानांसह पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्याचेही दहन निषेध करत असल्याचे दोन्ही नेत्यांनी सांगितले.

# 'जवान'नं भारतीय चित्रपट विश्वात घडवला इतिहास!

शाहरुखच्या जवाननं प्रदर्शित झाल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारचे विक्रम आपल्या नावावर केले आहेत. किंग खानच्या या चित्रपटाची चाहत्यांना बऱ्याच दिवसांपासून प्रतिक्षा होती. अखेर तो प्रदर्शित झाला आणि त्यानं वेगळा इतिहास घडवल्याचे दिसून आले आहे. शाहरुखचा जवान आणि गदर या दोन्ही चित्रपटांमध्ये सध्या स्पर्धा दिसून येत आहे. त्यात गदर २ ने पहिल्या दिवशी किती कमाई केली आणि जवाननं केलेल्या कमाईची तुलना करण्यात आली आहे. नेटकऱ्यांनी देखील त्यावरुन वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न उपस्थित केले आहेत. यासगळ्यात जवाननं बाजी मारल्याचे दिसून आले आहे. ॲटली दिग्दर्शित जवाननं एका दिवसांत भारतातून ७५ कोटींची कमाई केली आहे. तर जगभरातून १२९ कोटींची कमाई करुन भारतात नवा विक्रम केला आहे. जवान हा पहिला हिंदी चित्रपट ठरला आहे ज्यानं एकाच दिवसांत पूर्ण जगभरातून १२९ कोटींची कमाई केली आहे. सोशल मीडियावर सध्या किंग खानचा जवान हा ट्रेंडिंगचा विषय आहे. एक्स वर तर शाहरुखचा जवान हा नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतो आहे. दुसरीकडे बॉलीवूड, टॉलीवूडमधील वेगवेगळ्या सेलिब्रेटींनी देखील शाहरुखचे कौतुक केले आहे. त्यात साऊथचे एस एस राजामौलींनी देखील किंग खानला शुभेच्छा दिल्या आहेत. आपण शाहरुखला बॉक्स ऑफिसचा बादशाह का म्हणतो याचे कारणही राजामौलींनी त्यांच्या पोस्टमध्ये सांगितले आहे. त्याला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

सध्या सगळीकडे शाहरुखचा जवान चर्चेचा विषय आहे. गुगलनं देखील किंग खानचं कौतुक केलं आहे. त्यांनी गुगलच्या होमपेजवर जवानची थीम ठेवत त्याला शाहरुखचा आवाज दिला आहे. त्याचे स्क्रीन शॉट देखील वेगानं व्हायरल होत आहे. गुगलनं देखील एक्सवर पोस्ट करत ही माहिती दिली आहे. अशाप्रकारे येत्या दिवसात जवान हा वेगळा विक्रम करणार अशी चर्चा रंगली आहे.



# कंगना शाहरुखच्या 'जवान'ला घाबरली ?

बॉलीवूडची क्वीन कंगना रनौत ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या पोस्टसाठी ओळखली जाणारी अभिनेत्री आहे. वादग्रस्त काही बोलणे, त्यावर प्रतिक्रिया देणे, सगळ्यांपेक्षा नेहमीच वेगळी भूमिका मांडणे यामुळे कंगनाला मिळणारी प्रसिद्धीही मोठी असते. कंगना सध्या शाहरुखच्या जवानवर खूपच फिदा झाल्याचे दिसून आले आहे. किंग खानंच्या जवाननं कंगनाचं लक्ष वेधून घेतले आहे. कंगनानं पहिल्यांदाच शाहरुखचे एवढे कौतुक केले असेल अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचे दिसून आले आहे. अशातच कंगनाच्या चंद्रमुखी २ विषयी जी पोस्ट व्हायरल झाली आहे त्यावरुन तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. एक्सवर कंगनाचा चंद्रमुखी २ हा ट्रेंडिंगचा विषय असल्याचे दिसून आले आहे. काही दिवसांपूर्वी तिच्या या चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यात त्याची रिलिज डेट १९ सप्टेंबर होती. आता त्याची रीलीज डेट पुढे ढकलण्यात आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे चाहत्यांनाही धक्का बसला आहे. मात्र नेटकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत कंगनाला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. कंगनानं शाहरुखच्या जवानला घाबरुन तर चित्रपटाचे प्रदर्शन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला नाही ना, असा प्रश्नही काही नेटकऱ्यांनी विचारला आहे. पी वासू यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटामध्ये राघव लॉरेन्स आणि कंगना यांच्या प्रमुख भूमिका आहेत. आता २८ सप्टेंबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.कंगनानं पहिल्यांदाच शाहरुखचे एवढे कौतुक केले असेल अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचे दिसून आले आहे. अशातच कंगनाच्या चंद्रमुखी २ विषयी जी पोस्ट व्हायरल झाली आहे त्यावरुन तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. एक्सवर कंगनाचा चंद्रमुखी २ हा ट्रेंडिंगचा विषय असल्याचे दिसून आले आहे.



# यशचा पुढील चित्रपट ड्रग्ज सिंडिकेटवर आधारित

कन्नड चित्रपटांमधून, भारतीय चित्रपट उद्योगाला KGF फेम यशच्या रूपाने एक संपूर्ण भारतीय स्टार मिळाला आहे. या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाच्या प्रचंड यशानंतर, त्याच्या चाहत्यांपासून ते ट्रेड कॉरिडॉरपर्यंत सर्वजण यशचा पुढचा चित्रपट कोणता असेल याची आतुरतेने वाट पाहत आहेत. या पार्श्वभूमीवर दैनिक भास्करने विशेष माहिती मिळवली आहे. म्हणजेच यशचा पुढचा प्रोजेक्ट गोव्याच्या पार्श्वभूमीवर आधारित असेल. KGF प्रमाणे हा देखील एक पीरियड क्राईम ड्रामा असेल. गोव्यात 60 च्या दशकात रशियन आणि ड्रग्ज माफियांची घुसखोरी दाखवण्यात येणार आहे. यशचे पात्र रशियन वर्चस्वाला कसे आव्हान देते याची कथा असेल. यशच्या जवळच्या सूत्रांनी सांगितले की, 'या चित्रपटाचा दिग्दर्शक केजीएफसारखा प्रशांत नील असणार नाही. त्याऐवजी मल्याळम चित्रपटांचे दिग्दर्शक निश्चित करण्यात आले आहेत. त्यांचे नाव लता मेनन. त्या प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि सिनेमॅटोग्राफर राजीव मेनन यांच्या पत्नी आहेत. गोव्यातील ड्रग माफियांचा दक्षिणेतही कमी शोध लागला आहे. याशिवाय तेथील रशियन माफियांचे राजकीय संबंधही कमी उघड झाले आहेत. अशा परिस्थितीत यशला ते कथानक विषय म्हणून खुप आवडले. ते सुरू करण्याबाबत ते गांभीर्याने विचार करत आहेत. केजीएफ मालिकेप्रमाणे हा चित्रपटही ॲक्शन थ्रिलर असेल. सूत्रांनी सांगितले की, यश स्वतः या चित्रपटाचा निर्माता आहे. तेही 100 कोटींच्या वरच्या बजेटवर बसवले जात आहे. यशला चित्रपटाचे कथानक इतके आवडले आहे की तो सध्या इतर प्रकल्पांना बाजूला सारत आपले संपूर्ण लक्ष त्यावर केंद्रित करत आहे. ड्रग्ज आणि रशियन माफिया सोबतच हिप्पी संस्कृतीचे जे वातावरण त्यावेळी तिथे होते ते



अलीकडेच आप खासदार राघव चड्ढा हे अभिनेत्री परिणीती चोप्रासोबतच्या नात्याबद्दल बोलले. YOUTUBER रणवीर अलाहाबादियाशी बोलताना राघव चड्ढा म्हणाले की, ते दररोज परिणीतीला त्यांच्या आयुष्यात भेटू शकल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानतात. परिणीतीसोबतची त्यांची पहिली भेट खूपच जादुई होती, असेही ते म्हणाले. संभाषणादरम्यान राघव यांना विचारण्यात आले की ते परिणीतीला कसे भेटले? याला उत्तर देताना ते म्हणाले - आम्ही भेटताच खूप जादुई भावना होती. ही अशी गोष्ट आहे ज्यासाठी मी दररोज सर्वशक्तिमानाचे आभार मानतो. माझ्या आयुष्यात परिणीती असणे हा माझ्यासाठी सर्वात मोठा आनंद आहे. ती माझ्या आयुष्यात माझी जोडीदार म्हणून माझ्यासोबत आहे याबद्दल मी आभारी आहे. संभाषणादरम्यान, त्यांनी असेही सांगितले की त्यांना हे देखील जाणवते की संपूर्ण देश त्यांच्या लग्नासाठी खूप उत्सुक आहे. याबद्दल ते म्हणाले- मी देशापेक्षा जास्त आनंदी आहे. अलीकडेच राघव चड्ढा आणि परिणीती चोप्राच्या लग्नाच्या रिसेप्शन कार्डचा फोटो सोशल मीडियावर समोर आला आहे. कार्डसनुसार, हे जोडपे 30 सप्टेंबर रोजी चंदीगडमधील ताज हॉटेलमध्ये रिसेप्शन पार्टीचे आयोजन करतील. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, उदयपूरमध्ये जवळपास एक आठवडा लग्नाचे कार्यक्रम होणार असून 24 सप्टेंबरला दोघे लग्न करणार आहेत. यानंतर चंदीगडमध्ये रिसेप्शन पार्टी होणार आहे.



# परिणीतीसोबतच्या नात्याबद्दल बोलला राघव

# बाई तू तुझ्या देशात परत जा


नवाजुद्दीन सिद्दीकी हा सध्या त्याच्या हड्डी या सिनेमामुळे चर्चेत आहे. त्याचा हा सिनेमा ओटीटीवर रिलिज झाला आहे. मात्र आता चर्चा आहे ती नवाजची बायको आलिया सिद्दीकीची. ती बिग बॉस ओटीटीत झळकली होती. त्यानंतर तिच्या चर्चा थांबल्या मात्र आता परत आलिया अडचणीत सापडली आहे. आलिया सिद्दीकी तिच्या दोन्ही मुलांसोबत दुबईत राहते. दुबई प्रशासनाच्या काही अधिकाऱ्यांनी तिला तिचं राहत घर रिकामं करण्यास सांगितले आहे. 7 सप्टेंबर रोजी दुबईतील भाडे विवाद केंद्राचे अधिकारी आलियाच्या घरी पोहोचले होते. येथे अधिकाऱ्यांनी त्यांना घर रिकामे करण्याची DEPORTATION नोटीस बजावली. या नोटीसमध्ये म्हटले आहे की, भाडे न दिल्यास आलियाला आता अंदाजे 6.14 लाख रुपये भाड्याची रक्कम देत घर रिकामे करावं लागणार आहे.

# भारत-पाक सामन्यावर पावसाचे सावट!

## » दुसऱ्या सुपर-4 सामन्यासाठी राखीव दिवस नाही

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**कोलंबोत आशिया कपच्या सुपर-4 टप्प्यातील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पूर्ण झाला नाही, तर 11 सप्टेंबर हा दिवस राखीव दिवस म्हणून ठेवण्यात आला आहे. सुपर-4 टप्प्यातील तिसरा सामना भारत आणि पाकिस्तान यांच्यात 10 सप्टेंबर रोजी कोलंबो, श्रीलंकेत होणार आहे. आज कोलंबोमध्ये पावसाची 90% शक्यता आहे. तापमान 26 ते 32 अंश सेल्सिअस पर्यंत असू शकते.**



एएनआय या वृत्तसंस्थेनुसार, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सुपर-4 टप्प्यातील सामन्यासाठी 11 सप्टेंबर हा दिवस राखीव दिवस म्हणून ठेवण्यात आला आहे. हा सामना 11 सप्टेंबरला त्याच ठिकाणी खेळवला जाईल, जिथे तो 10 सप्टेंबरला थांबला होता. वास्तविक, यापूर्वी 2 सप्टेंबरला भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाला होता.

सुपर-4 सामन्यासाठी कोणताही राखीव दिवस नाही, तो फक्त भारत-पाकिस्तानसाठी आहे. याशिवाय इतर कोणत्याही सामन्यात पाऊस पडल्यास तो रद्द करण्यात येईल. भारत-पाकिस्तान सामन्याव्यतिरिक्त, फक्त आशिया कप 2023 फायनलसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. श्रीलंकेच्या हवामान खात्यानुसार, रविवारी कोलंबोमध्ये सामन्याच्या वेळी दुपारी 2 वाजल्यापासून मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना भारतीय वेळेनुसार दुपारी 3 वाजता होणार आहे. नाणेफेक दुपारी 2.30 वाजता होईल. कोलंबोमध्ये पावसामुळे टीम इंडियाने गुरुवारी म्हणजेच 7 सप्टेंबरला इनडोअर स्टेडियममध्ये सराव केला. बीसीसीआयने टीम इंडियाच्या इनडोअर सरावाचा फोटो ट्विट केला आहे. उद्या म्हणजेच 9 सप्टेंबरपासून सुपर-4 टप्प्यातील उर्वरित 5 सामने कोलंबोमध्ये खेळवले जाणार आहेत. दरम्यान, कोलंबो शहरात पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. हवामान अहवालानुसार 17 सप्टेंबरपर्यंत कोलंबोमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

याआधी असे वृत्त होते की सामने कोलंबोहून हंबनटोटा येथे हलवले जातील. परंतु पीसीबी आणि एसीसी या विषयावर एकमत होऊ शकले नाहीत, त्यामुळे सध्या सुपर-4 सामने कोलंबोमध्येच होणार आहेत. आशिया चषक स्पर्धेतील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील एकदिवसीय सामना शनिवारी पावसामुळे रद्द झाला. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात 44व्यांदा भारताचा सामना रद्द करण्यात आला. या प्रकरणात टीम इंडियाच्या नावावर आधीच एक विश्वविक्रम आहे. भारतातील प्रत्येक 24वा वनडे रद्द होतो. सामने रद्द होण्यामागे पाऊस हा सर्वात मोठा घटक आहे. मात्र, पावसाशिवाय काही सामने रद्दही झाले आहेत.

### आझम या सामन्यात लवकर बाद

» उद्या म्हणजेच 9 सप्टेंबरपासून सुपर-4 टप्प्यातील उर्वरित 5 सामने कोलंबोमध्ये खेळवले जाणार आहेत. दरम्यान, कोलंबो शहरात पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. हवामान अहवालानुसार 17 सप्टेंबरपर्यंत कोलंबोमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. याआधी असे वृत्त होते की सामने कोलंबोहून हंबनटोटा येथे हलवले जातील. परंतु पीसीबी आणि एसीसी या विषयावर एकमत होऊ शकले नाहीत, त्यामुळे सध्या सुपर-4 सामने कोलंबोमध्येच होणार आहेत.

# बोपण्णाच्या जोडीने केला अमेरिकन जोडीचा पराभव

## » फ्रेंच जोडीचा सरळ सेटमध्ये पराभव; गॉफ पहिल्यांदाच फायनलमध्ये

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडेन यूएस ओपन 2023 च्या पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचले आहेत. या विजयानंतर 43 वर्षे 6 महिने वयाचा बोपण्णा ग्रँड स्लॅम फायनलमध्ये पोहोचणारा ओपन एरामधील सर्वात वयस्कर खेळाडू बनला आहे. बोपण्णापूर्वी हा विक्रम कॅनडाच्या डॅनियल नेस्टरच्या नावावर होता.**



बोपण्णा तब्बल १३ वर्षांनंतर या ग्रँडस्लॅमच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. यापूर्वी २०१० मध्ये अंतिम फेरी गाठली होती. त्यानंतर बोपण्णाचा साथीदार होता पाकिस्तानचा ऐसाम-उल-हक कुरेशी.

बोपण्णाने ग्रँडस्लॅम पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचण्याची ही दुसरी वेळ आहे. ही स्पर्धा न्यूयॉर्कमध्ये खेळवली जात आहे. बोपण्णाने ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडेनसह गुरुवारी रात्री पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत पाच वेळा ग्रँडस्लॅम चॅम्पियन फ्रेंच जोडी पियरे-ह्युग्स हर्बर्ट आणि निकोलस माहुत यांचा ७-६ (७-३), ६-२ असा पराभव केला.

हा सामना 1 तास 34 मिनिटे चालला. मात्र, बोपण्णा मिश्र दुहेरीत आधीच बाहेर आहे. इंडोनेशियन जोडीदार अल्दिला सुतजियादीसोबत दुसऱ्या फेरीत तो पराभूत झाला. भारताच्या रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडेन यांनी पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत नॅथॅनियल लॅमन्स आणि जॅक्सन विथ्रो या अमेरिकन जोडीचा ७-६(१०), ६-१ असा पराभव केला. तत्पूर्वी, त्यांनी प्री-क्वार्टर फायनलमध्ये ज्युलियन कॅश आणि हेन्री पॅटन या जोडीचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले.

बोपण्णा आणि एबडेन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला विम्बल्डनची उपांत्य फेरी गाठली होती. अमेरिकेची युवा टेनिसपटू कोको गॉफने झेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हा हिचा पराभव करून पहिल्या यूएस ओपन महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. 19 वर्षीय अमेरिकन खेळाडूने चेक खेळाडूवर 6-4, 7-5 असा विजय मिळवत इतिहासात प्रथमच यूएस ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. यूएस ओपनमध्ये कोको गॉफ आणि कॅरोलिना मुचोवा यांच्या उपांत्य फेरीच्या सामन्यादरम्यान, तीन आंदोलकांनी सामना व्यत्यय आणला. हे तिघेही हवामान विरोधक होते. त्याने घातलेल्या शर्टवर "END FOSSIL FUELS" असे लिहिले होते. प्रदर्शनामुळे हा उपांत्य फेरीचा सामना 49 मिनिटे थांबवण्यात आला.

### फायनलमध्ये पोहोचणारा वयस्कर खेळाडू

» भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडेन यूएस ओपन 2023 च्या पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचले आहेत. या विजयानंतर 43 वर्षे 6 महिने वयाचा बोपण्णा ग्रँड स्लॅम फायनलमध्ये पोहोचणारा ओपन एरामधील सर्वात वयस्कर खेळाडू बनला आहे. बोपण्णापूर्वी हा विक्रम कॅनडाच्या डॅनियल नेस्टरच्या नावावर होता. भारताच्या रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडेन यांनी पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत नॅथॅनियल लॅमन्स आणि जॅक्सन विथ्रो या अमेरिकन जोडीचा ७-६(१०), ६-१ असा पराभव केला. तत्पूर्वी, त्यांनी प्री-क्वार्टर फायनलमध्ये ज्युलियन कॅश आणि हेन्री पॅटन या जोडीचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. बोपण्णा आणि एबडेन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला विम्बल्डनची उपांत्य फेरी गाठली होती.